## आजचे पंचांग

शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, शुक्लपक्ष, प्रतिपदा दुपारी २-११ पर्यंत नंतर द्वितीया तिथी, दिवस नक्षत्र – अश्विनी सकाळी ९-४३ पर्यंत
चंद्र रास- मेष, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## एसटी प्रवाशांना झटका

**पुणे**: उन्हाळी सुट्ट्यांमध्ये एसटीने गावाला किंवा पर्यटनाला जाण्याचे नियोजन करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला आता कात्री लागणार आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीसाठी तिकीट दरात १० टक्के हंगामी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यासोबतच प्रवाशांना प्रत्येक तिकिटावर २ रुपये स्वच्छता अधिभार देखील मोजावा लागणार आहे. प्रवाशांना ही भाडेवाढ भलतीच महाग पडणार आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. १८ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - २०३ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### ट्यूलिप गार्डनला भेट देणाऱ्यांची संख्या घटली

**श्रीनगर** : आशियातील सर्वात मोठे आणि येथील प्रमुख पर्यटन स्थळ असलेल्या इंदिरा गांधी मेमोरियल ट्यूलिप गार्डनमध्ये यावर्षी पर्यटकांच्या संख्येत मोठी घट झाली असून, पर्यटकांची संख्या ५० टक्क्यांहून अधिक घटली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. गेल्या वर्षी ८.५५ लाख पर्यटकांनी भेट दिली होती, जी आतापर्यंतची सर्वाधिक गर्दी होती, असे त्यांनी सांगितले. यावर्षी मात्र, सुमारे १२०० परदेशी नागरिकांसह केवळ ३.९० लाख पर्यटकांनी बागेला भेट दिली आहे.

### दोन पोलीस निरीक्षकांची बदली

**कोलकाता** : पश्चिम बंगालमधील दोन पोलीस निरीक्षकांची बदली करण्यात आली असून, त्यांना आगामी विधानसभा निवडणुकांशी संबंधित कोणतीही कर्तव्ये सोपवली जाणार नाहीत, असे गुरुवारी जारी केलेल्या एका अधिकृत आदेशात म्हटले आहे. बागूइयाटी पोलीस ठाण्याचे अमित कुमार मित्रा यांची हावडा ग्रामीण येथील अश्वारूढ पोलीस बटालियनमध्ये, तर नरेंद्रपूर पोलीस ठाण्याचे सुरेंद्र कुमार सिंह यांची हावडा शासकीय रेल्वे पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे.

### रुग्णालयात नेत असताना कैद्याचा मृत्यू

**होशियारपूर (पंजाब)** : येथील मध्यवर्ती कारागृहातील एका कैद्याची प्रकृती अचानक खालावल्याने त्याला रुग्णालयात नेत असताना शुक्रवारी त्याचा मृत्यू झाला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मृताची ओळख होशियारपूरमधील रविदास नगर परिसरातील रहिवासी अमन लोई अशी पटली आहे.

## महिला आरक्षण विधेयक लोकसभेत फेटाळले

# संसदेत मोदी हारले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : महिला आरक्षणाची अंमलबजावणी वेगाने करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने आणलेले संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, २०२६ लोकसभेत शुक्रवारी आवश्यक बहुमताअभावी फेटाळले गेले. दीर्घ चर्चेनंतर झालेल्या मतदानात सरकारला अपेक्षित दोन-तृतीयांश पाठिंबा मिळू शकला नाही आणि त्यामुळे हे महत्त्वाकांक्षी विधेयक संमत होऊ शकले नाही.

या विधेयकाला विरोध केल्यास विरोधकांना राजकीयदृष्ट्या ते महागात पडेल, असा इशारा पंतप्रधान मोदी यांनी दिला होता. मात्र, आवश्यक ती दोन तृतीयांश मते मिळविण्यात मोदी सरकार अपयशी ठरले.

मतविभाजनात विधेयकाच्या बाजूने २९८ मते पडली, तर २३० सदस्यांनी विरोधात मतदान केले. एकूण ५२८ खासदारांनी मतदानात भाग घेतल्याने विधेयक मंजूर होण्यासाठी किमान ३५२ मतांची आवश्यकता होती. मात्र ही संख्या गाठता न आल्याने विधेयक कोसळले. संसदेतील या पराभवानंतर सरकारला राजकीय धक्का बसल्याचे मानले जात आहे.

या विधेयकाचा पराभव झाल्यानंतर मतदारसंघ पुनर्रचना (परिसीमन) आणि लोकसभा जागांची संख्या वाढवण्याशी संबंधित इतर दोन विधेयकेही पुढे नेण्यात आली नाहीत. त्यामुळे महिला आरक्षणासोबत जोडलेला व्यापक राजकीय आराखडा सध्या तरी स्थगित अवस्थेत गेला आहे. लोकसभेत या विधेयकावर गुरुवारी रात्री उशिरापर्यंत चर्चा झाली आणि शुक्रवारीही ती सुरूच राहिली. चर्चेदरम्यान सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये तीव्र मतभेद स्पष्टपणे दिसून आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सभागृहात हस्तक्षेप करत, विरोधी पक्षांच्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला. विशेषतः दक्षिण भारतातील राज्यांच्या प्रतिनिधित्वावर परिणाम होईल, या भीतीला त्यांनी उत्तर देत लोकसभेची संख्या वाढवली तरी कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही, असे आश्वासन दिले. हा विषय राजकारणाच्या चष्म्यातून न पाहता राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने पाहावा, असे आवाहन त्यांनी



सदस्यांना केले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही सरकारची भूमिका ठामपणे मांडली. लोकसभेची विद्यमान संख्या ५४३ वरून सुमारे ८१६ पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला असून, त्यामुळे दक्षिणेकडील राज्यांचे प्रतिनिधित्व कमी होणार नाही, उलट काही प्रमाणात वाढ होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

विरोधी पक्षांनी या विधेयकाला सुरुवातीपासूनच कडाडून विरोध केला. परिसीमन आणि जागावाढीच्या प्रस्तावामुळे काही राज्यांचे प्रतिनिधित्व कमी होण्याची शक्यता असल्याचा मुद्दा त्यांनी जोरदारपणे उपस्थित केला. तसेच, महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीची प्रक्रिया आणि त्यामागील राजकीय हेतूंवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

# अक्षय्य तृतीयेला हापूस महागला...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या अक्षय्य तृतीया (१९ एप्रिल) निमित्त पूर्वजांना आंब्याचा नैवेद्य दाखवण्याची परंपरा आहे. मात्र, यंदा वाढत्या महागाईमुळे या परंपरेवरच सावट आले असून हापूस आंबा सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेला आहे.

हवामान बदलाचा फटका बसल्याने कोकणातील हापूस उत्पादनात मोठी घट झाली आहे. परिणामी घाऊक बाजारात आंब्याचे दर प्रति डझन ८०० ते १,५०० रुपये इतके वाढले आहेत. त्यामुळे ग्राहकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा मार्केट यार्डमधील आंब्याची आवक लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. मागील वर्षी दररोज २० हजार ते २५ हजार पेट्या येत असताना, यंदा ही संख्या केवळ ८ हजार ते १० हजार पेट्यांपर्यंत मर्यादित राहिली आहे.

आखाती देशांकडे होणारी निर्यात काही प्रमाणात घटल्याने माल स्थानिक बाजारात वळवण्यात आला असला, तरी एकूणच टंचाईमुळे दरात मोठी वाढ झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

गेल्या वर्षी अक्षय्य तृतीयेच्या काळात हापूस आंबा प्रति डझन ५०० ते ८०० रुपये दराने उपलब्ध होता. यंदा मात्र तोच दर १,५०० रुपयांपर्यंत पोहोचल्याने ग्राहकांच्या खिशाला मोठा फटका बसत आहे. हवामान बदलामुळे उत्पादन घटल्याने बागायतदार आणि व्यापारी दोघेही चिंतेत आहेत.

एकूण परिस्थिती पाहता, यंदा अनेक कुटुंबांची अक्षय्य तृतीया हापूसच्या चवीविना जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# अखेर ४८ दिवसांनंतर होर्मुझ सामुद्रधुनी खुली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : होर्मुझ सामुद्रधुनी व्यापारी जहाजांसाठी पुन्हा पूर्णपणे खुली करण्यात आल्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प आणि इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांनी केली. याच वेळी लेबनॉनमधील १० दिवसांची युद्धबंदी कायम असल्याचेही स्पष्ट झाले, ज्यामुळे पश्चिम आशियातील तणाव काही प्रमाणात कमी झाल्याचे संकेत मिळाले.

या युद्धविरामामुळे इस्रायल आणि हिजबुल्ला यांच्यातील लढाईला तात्पुरता विराम मिळाला आहे. अनेक आठवडे सुरू असलेल्या संघर्षानंतर शांततेकडे वाटचाल होण्याची शक्यता निर्माण झाली असली, तरी अंतिम कराराबाबत अद्याप अनिश्चितता कायम आहे. विशेषतः हिजबुल्लाचा वाटाघाटींमध्ये थेट सहभाग नसल्याने आणि इस्रायली सैन्य दक्षिण लेबनॉनमधील काही भागात कायम राहणार असल्याच्या शक्यतेमुळे हा करार कितपत टिकेल, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.


सोशल मीडियावरील पोस्टमध्ये ट्रम्प यांनी इराणने सामुद्रधुनी पूर्णपणे खुली केल्याची माहिती दिली. त्यानंतर काही मिनिटांतच इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनीही सामुद्रधुनी सर्व व्यापारी वाहतुकीसाठी खुली असल्याचे जाहीर केले. युद्धविरामाच्या उर्वरित कालावधीत हा मार्ग खुला राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

## पाकव्याप्त काश्मीर हा भारताचाच अविभाज्य भाग असल्याचा संदेश

# सीमांकन विधेयकामुळे पाकचा जळफळाट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने संसदेच्या विशेष अधिवेशनात सादर केलेल्या 'सीमांकन विधेयक २०२६'मुळे देशांतर्गत राजकारण तापले असतानाच आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्याचे पडसाद उमटले आहेत. विशेषतः पाकिस्तानव्याप्त काश्मीर संदर्भातील तरतुदीवरून पाकिस्तानने तीव्र प्रतिक्रिया नोंदवत भारतावर टीकेची झोड उठवली आहे.




विधेयकातील तरतुदीनुसार, पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीर भाग भारताच्या नियंत्रणात आल्यानंतर त्या क्षेत्रातील मतदारसंघांची पुनर्रचना करण्याचा अधिकार केंद्रीय निवडणूक आयोगाला दिला जाणार आहे. या तरतुदीतून जम्मू आणि काश्मीरसह पाकिस्तानव्याप्त काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असल्याची भूमिका पुन्हा अधोरेखित करण्यात आली आहे. प्रत्यक्षात ही प्रक्रिया त्या भागाच्या मुक्तीनंतरच राबवली जाणार असली, तरी या कायदेशीर चौकटीमुळे भविष्यातील राजकीय आराखड्याचा स्पष्ट संकेत दिला गेला आहे.

यावर प्रतिक्रिया देताना पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने या तरतुदींना "पूर्णतः अमान्य" ठरवत भारताचा प्रयत्न "बेकायदेशीर आणि प्रक्षोभक" असल्याचा आरोप केला. जम्मू-काश्मीरमधील कोणत्याही भागाची पुनर्व्याख्या करण्याचा भारताला अधिकार नसल्याचा दावा करत त्यांनी आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन झाल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, केंद्र सरकारकडून महिला आरक्षणाची अंमलबजावणी २०२९ पासून सुनिश्चित करण्यासाठी एकूण तीन विधेयके सादर करण्यात आली आहेत. यामध्ये नारी शक्ती वंदन अधिनियम २०२३ मध्ये सुधारणा करणारे संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, मतदारसंघ पुनर्रचनेसाठी सीमांकन विधेयक आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये महिला आरक्षण लागू करण्यासाठी स्वतंत्र विधेयकाचा समावेश आहे.

प्रस्तावित बदलांनुसार, लोकसभेची एकूण सदस्यसंख्या ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव असून, त्यासाठी संविधानातील कलम ८१ मध्ये दुरुस्ती केली जाणार आहे. तसेच, मतदारसंघ पुनर्रचनेसाठी २०११ च्या जनगणनेचा आधार घेण्याचा विचार असून, प्रत्येक जनगणनेनंतर सीमांकन करणे बंधनकारक ठेवणारी कलम ८२ मधील अट शिथिल करण्याचाही प्रस्ताव आहे. या सर्व घडामोडींमुळे एकीकडे देशांतर्गत राजकीय आरोप-प्रत्यारोप तीव्र झाले आहेत, तर दुसरीकडे पाकिस्तानशी संबंधित संवेदनशील मुद्द्यावर नव्या तणावाची भर पडली आहे. महिला आरक्षण, परिसीमन आणि भौगोलिक दाव्यांचा संगम असलेले हे विधेयक आगामी काळात राजकीय आणि धोरणात्मक पातळीवर महत्त्वपूर्ण ठरण्याची चिन्हे आहेत.

## धर्मप्रसाराला प्रोत्साहन दिल्याचा गंभीर आरोप

# पुण्यातील आयटी क्षेत्रातही धर्मांतराचे लोण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : नाशिकमधील आयटी कंपनीतील कथित धर्मांतर प्रकरणानंतर आता पुण्यातील आयटी क्षेत्रातूनही अशाच स्वरूपाचे आरोप पुढे आल्याने खळबळ उडाली आहे. हिंजवडी, खराडी आणि विमाननगर या प्रमुख आयटी हबमध्ये कार्यरत काही अभियंत्यांनी कंपनी प्रशासनावर दुजाभाव आणि धर्मप्रसाराला प्रोत्साहन दिल्याचे गंभीर आरोप केले आहेत.

काही नामांकित आयटी कंपन्यांतील कर्मचाऱ्यांनी आपले अनुभव मांडताना सांगितले की,



कार्यालयातील मीटिंग रूम्सचा वापर विशिष्ट समुदायासाठी प्रार्थना स्थळ म्हणून केला जात आहे. अधिकृत कामकाजासाठी असलेल्या जागांचा असा वापर होत असताना व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा दावा त्यांनी केला.

कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, केवळ प्रार्थनापुरतेच नव्हे तर सुट्ट्यांच्या बाबतीतही भेदभाव केला जात आहे. काहींनी आरोप केला की, हिंदू सणांच्या दिवशी कामाचा दबाव टाकला जातो किंवा सुट्ट्या नाकारल्या जातात; तर रमजानसारख्या कालावधीत विशिष्ट समुदायाला सवलती दिल्या जातात. या कंपन्यांमध्ये काही कर्मचारी उघडपणे धार्मिक प्रचार करत असून सहकाऱ्यांवर मतपरिवर्तनासाठी दबाव टाकला जात असल्याचा आरोपही पुढे आला आहे. कंपनीच्या आवारातच धर्मांतरासाठी प्रवृत्त करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा दावा करत, या प्रकारांना व्यवस्थापनाचा अप्रत्यक्ष पाठिंबा असल्याची शंका कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. "आम्ही कामासाठी येतो की धर्मप्रचाराला सामोरे जाण्यासाठी?" असा सवाल काही कर्मचाऱ्यांनी उपस्थित केला आहे.

या आरोपांमुळे आयटी क्षेत्रातील व्यावसायिक वातावरण आणि पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा प्रकार एखाद्या एकाच कंपनीपुरता मर्यादित नसून व्यापक स्वरूपात पसरलेला असू शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. राज्य सरकारने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संबंधित कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली आहे.

### चकमकीत चार माओवादी ठार

**हजारीबाग (झारखंड)** : झारखंडच्या हजारीबाग जिल्ह्यात शुक्रवारी सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत चार माओवादी ठार झाले, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. केरेडारी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बटुका वनक्षेत्रात मिळालेल्या माहितीनुसार ही चकमक झाली, असे त्यांनी सांगितले. ठार झालेल्या अतिरेक्यांपैकी एकाची ओळख सहदेव महतो अशी पटली असून, त्याच्यावर १५ लाख रुपयांचे बक्षीस होते. एसडीपीओ पवन कुमार म्हणाले, "चकमकीत चार माओवादी ठार झाले आहेत. या कारवाईत कोणताही सुरक्षा कर्मचारी जखमी झाला नाही."

# खरातांचे निकटवर्तीय शेळके ठार

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**छत्रपती संभाजीनगर** : समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसतानाच शुक्रवारी आणखी एक भीषण अपघात घडला. या अपघातात शिवनिका ट्रस्टचे माजी उपाध्यक्ष आणि उद्योजक जितेंद्र शेळके यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्या कुटुंबीयांना गंभीर दुखापत झाली आहे.

संभाजीनगरहून शिर्डीकडे जात असताना धोत्रे गावाजवळ शेळके यांच्या कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कार थेट कंटेनरच्या खालच्या भागात घुसली. या अपघातात शेळके यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातावेळी कारमध्ये असलेल्या त्यांच्या कुटुंबीयांनाही गंभीर दुखापत झाली. त्यांच्या मुलाला तातडीने बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळते.

अपघातानंतर शेळके यांच्या पत्नी बराच वेळ कारमध्ये अडकून पडल्या होत्या. त्यांना बाहेर काढण्यासाठी प्रशासन आणि बचाव पथकांनी युद्धपातळीवर प्रयत्न केले. जितेंद्र शेळके हे वादग्रस्त ठरलेल्या 'शिवनिका ट्रस्ट'शी संबंधित होते. ट्रस्टचे प्रमुख अशोक खरात यांचे ते निकटवर्तीय मानले जात होते. उपाध्यक्ष म्हणून त्यांनी ट्रस्टमध्ये काम पाहिले होते. तसेच खरात यांच्या लॉन्स व्यवसायातही त्यांचा सहभाग होता.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून अशोक खरात यांना झालेल्या अटकेमुळे जितेंद्र शेळके हे प्रचंड मानसिक तणावाखाली होते, असे समजते.


या पार्श्वभूमीवर घडलेल्या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## एफआयआर नोंदवण्याचे अलाहाबाद उच्च न्यायालयाचे आदेश

# दुहेरी नागरिकत्व प्रकरणात राहुल गांधींना धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनौ** : दुहेरी नागरिकत्वाच्या आरोपांप्रकरणी काँग्रेसचे खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अडचणी वाढल्या असून अलाहाबाद उच्च न्यायालयाने त्यांच्या विरोधात एफआयआर नोंदवण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने हा आदेश देताना आरोपांची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.
खंडपीठाने उत्तर प्रदेश सरकारला या प्रकरणाची चौकशी स्वतः करावी किंवा केंद्रीय यंत्रणेमार्फत करून घ्यावी, असे निर्देश दिले आहेत. त्यामुळे या प्रकरणाला



आता अधिकृत तपासाची जोड मिळणार आहे.
राहुल गांधी यांच्यावर भारतीय आणि ब्रिटिश असे दुहेरी नागरिकत्व असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याचिकाकर्ते विघ्नेश शिशिर यांनी दाखल केलेल्या याचिकेत गांधी यांच्याकडे दोन देशांचे पासपोर्ट असू शकतात, असा दावा करत ते भारतीय कायद्याचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे.
या प्रकरणाची सुनावणी उच्च न्यायालयात काही काळापासून सुरू होती आणि यासंदर्भातील कागदपत्रे सादर करण्याचे आदेशही सरकारला देण्यात आले होते.
यापूर्वी २८ जानेवारी रोजी लखनौ येथील विशेष खासदार-आमदार न्यायालयाने एफआयआर नोंदवण्याची मागणी फेटाळली होती. नागरिकत्वाच्या मुद्द्यावर निर्णय घेण्याचा अधिकार आपल्या कक्षेबाहेर असल्याचे नमूद करत त्या न्यायालयाने याचिका निकाली काढली होती. मात्र, त्याविरोधात पुन्हा उच्च न्यायालयात धाव घेण्यात आली होती.
याचिकाकर्त्यांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस), शासकीय गुप्तता कायदा, परदेशी नागरिक कायदा आणि पासपोर्ट कायद्यांतर्गत विविध आरोप लावले असून सखोल चौकशीची मागणी केली आहे.
यापूर्वीच्या सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने केंद्र सरकारलाही विचारणा करत या संदर्भातील तक्रारीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, याबाबत स्पष्टीकरण मागितले होते.
दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याविरोधातील कथित अपमानास्पद वक्तव्यप्रकरणी राहुल गांधी यांच्यावरील मानहानीच्या खटल्याची सुनावणी पुन्हा पुढे ढकलण्यात आली आहे. खासदार-आमदार न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २२ एप्रिल रोजी निश्चित केली आहे. आवाजाच्या ध्वनिमुद्रणाच्या न्यायवैद्यक तपासणीशी संबंधित मुद्द्यांमुळे हा खटला काही काळापासून प्रलंबित आहे. या घडामोडींमुळे राहुल गांधी यांच्यावरील कायदेशीर दबाव वाढण्याची चिन्हे दिसत असून, पुढील काही दिवसांत या प्रकरणात महत्त्वाच्या घडामोडी घडण्याची शक्यता आहे.

# करारा जवाब मिलेगा... सहरच्या वडिलांचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ठाणे** : मुंब्रा येथील एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख यांच्यावरील कथित बोगस जात प्रमाणपत्र प्रकरणात नवीन घडामोड समोर आली असून, त्यांचे वडील युनिस शेख यांनी मुंब्रा पोलीस ठाण्यात हजेरी लावली.

गेल्या दोन दिवसांपासून संपर्काबाहेर असलेले युनिस शेख अखेर पोलिसांसमोर हजर झाल्यानंतर त्यांनी विरोधकांवर तीव्र शब्दांत निशाणा साधला.

पोलीस अधिकाऱ्यांसोबत सुमारे १५ ते २० मिनिटे चर्चा केल्यानंतर माध्यमांशी बोलताना युनिस शेख आक्रमक भूमिकेत दिसले. "आमच्यावर केलेले सर्व आरोप बिनबुडाचे आहेत. पुढील दोन दिवसांत आम्ही कायदेशीर भूमिका स्पष्ट करू आणि विरोधकांना करारा जवाब देऊ," असे त्यांनी ठामपणे सांगितले. सध्या सहर शेख नेमक्या कुठे आहेत, याबाबत युनिस शेख यांनी स्पष्ट माहिती दिली नाही. मात्र, त्यांच्या बाजूने ठाम भूमिका घेत आरोप फेटाळून लावले.

संपूर्ण प्रकरण हे राजकीय हेतूने रचलेले असल्याचा आरोप करत त्यांनी म्हटले की, "माझी मुलगी प्रगती करत असल्याने काहींना ते सहन होत नाही. त्यामुळेच हे कारस्थान रचले गेले आहे." वानखेडे स्टेडियमवर सहर शेख सामना पाहताना दिसल्याच्या व्हिडिओबाबत विचारले असता, "सामना पाहायला जाणे हा तिचा अधिकार आहे. त्यात काहीही गैर नाही," असे युनिस शेख यांनी स्पष्ट केले. कैसे हराया असे म्हणत सहर हिने विरोधकांना उत्तर दिल्याने ती चर्चेत आली होती.

## संपादकीय

### बॅटरी, बळ आणि बचतीचा संभ्रम



**दिल्ली सरकारने इलेक्ट्रिक वाहनांच्या धोरणाचे नवे प्रारूप मांडताना सवलती आणि समन्यायी वाटप यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. प्रदूषणाच्या विळख्यात अडकलेल्या राजधानीला 'ई-क्रांती'कडे नेण्याचे हे स्वप्न कागदावर आकर्षक वाटत असले, तरी पायाभूत सुविधा आणि आर्थिक तर्काच्या कसोटीवर ते किती उतरेल, हा खरा प्रश्न आहे.**

दिल्लीच्या हवेत केवळ धूर नसतो, तर धोरणांचा गुदमरलेला श्वासही असतो. हिवाळा आला की धुरक्याच्या चादरीत लपेटल्या जाणाऱ्या या महानगराला आता 'इलेक्ट्रिक' मुक्तीचे वेध लागले आहेत. दिल्ली सरकारने आपले नवे 'इलेक्ट्रिक वाहन धोरण २.०' जाहीर करताना ज्या काही महत्त्वाकांक्षी घोषणा केल्या आहेत, त्या पाहता सरकारला आता केवळ पर्यावरणाचीच नव्हे, तर सामाजिक न्यायाचीही चिंता सतावत असल्याचे दिसते. कोणत्याही धोरणाचे यश हे त्यातील 'इन्सेटिव्ह' म्हणजेच प्रोत्साहनांवर अवलंबून असते. आता भर आहे तो ई-सायकल, ई-दुचाकी आणि प्रामुख्याने सार्वजनिक वाहतुकीवर. हे तत्त्वतः योग्यच आहे. आपण प्रदूषणाची चर्चा करतो, तेव्हा रस्त्यावरील खासगी कारपेक्षा लाखो दुचाकी आणि जुन्या डिझेल बस अधिक घातक ठरतात. ताज्या विश्लेषणानुसार, दिल्ली सरकार आता केवळ गाड्या विकत घेण्यासाठी पैसे देणार नाही, तर त्या गाड्या चालवण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांच्या जाळ्यावर लक्ष केंद्रित करणार आहे. हे 'इन्व्हर्टेड मॉडेल' स्वागतार्ह असले तरी, त्यात काही तांत्रिक आणि आर्थिक पेच आहेत. पहिला पेच आहे तो 'रेंज अँझायटी' म्हणजेच बॅटरी संपण्याच्या भीतीचा. तुम्ही गाडीवर कितीही सबसिडी दिली, तरी जोपर्यंत प्रत्येक दोन-चार किलोमीटरवर चार्जिंग स्टेशन दिसत नाही, तोपर्यंत भारतीय ग्राहक पेट्रोलचा पंप सोडून प्लगकडे वळणार नाही. दिल्लीतील वीज पुरवठ्याचे जाळे हे वाढीव भार सहन करण्यास सक्षम आहे का? जर हजारो वाहने एकाच वेळी चार्ज होऊ लागली, तर ग्रीडवर येणारा ताण हाताळण्यासाठी 'स्मार्ट ग्रीड'ची जी संकल्पना मांडली जाते, ती अद्याप आपल्याकडे बाल्यावस्थेत आहे. या धोरणातील 'समन्याय' हा भाग विशेष लक्षवेधी आहे. गरीब वर्गाला, विशेषतः डिलिव्हरी बॉईज किंवा रिक्षाचालकांना ई-वाहनांकडे वळवण्यासाठी सुलभ कर्ज आणि व्याजात सवलत देण्याची तरतूद आहे. पण, ई-वाहनांची मूळ किंमतच इतकी जास्त आहे की, सबसिडी देऊनही ती सामान्यांच्या आवाक्याबाहेरच राहतात. बॅटरी स्वॅपिंग हा यावर एक उत्तम पर्याय ठरू शकतो, जिथे बॅटरी विकत न घेता भाड्याने वापरता येते. मात्र, या क्षेत्रात अद्याप मानकीकरणाचा अभाव आहे. प्रत्येक कंपनीची बॅटरी वेगळी, तिचे व्होल्टेज वेगळे. जोपर्यंत सर्व कंपन्या एकाच धाटणीच्या बॅटरी वापरत नाहीत, तोपर्यंत स्वॅपिंग स्टेशन्सचा उपयोग मर्यादितच राहील. आपण इलेक्ट्रिक गाड्यांना 'झिरो एमिशन' म्हणतो, पण ती गाडी ज्या विजेवर चालते, ती वीज कुठून येते? भारताचा ७० टक्क्यांहून अधिक वीजपुरवठा आजही कोळशावर आधारित औष्णिक वीज केंद्रांतून होतो. म्हणजे दिल्लीत धूर निघत नसेल, तर तो कुठेतरी लांब असलेल्या कोळसा खाणीच्या परिसरात निघत असतो. सौर ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर चार्जिंग स्टेशन्ससाठी करणे हाच यावर खरा उपाय आहे. दिल्लीच्या या प्रस्तावातून इतर राज्यांनी, विशेषतः महाराष्ट्राने शिकण्यासारखे खूप आहे. महाराष्ट्राचे ई-वाहन धोरण हे उत्पादनावर अधिक भर देणारे आहे, तर दिल्लीचे धोरण वापराला प्रोत्साहन देणारे आहे. या दोन्हीचा सुवर्णमध्य साधणे गरजेचे आहे. केवळ सवलतींची खैरात वाटून इप्सित साध्य होत नसते. त्यासाठी एक संपूर्ण 'इकोसिस्टिम' उभी करावी लागते. यामध्ये बॅटरीच्या रिसायकलिंगचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. पाच-सात वर्षांनंतर जेव्हा या लाखो बॅटरी निकामी होतील, तेव्हा त्यांच्या विल्हेवाटीचे काय? तोपर्यंत आपण कचऱ्याचा एक नवा डोंगर उभा केलेला असेल. दिल्लीचे हे धोरण सध्या 'प्रारूप' अवस्थेत आहे. त्यावर चर्चा होतील, सुधारणा सुचवल्या जातील. पण मूळ प्रश्न राजकीय इच्छाशक्तीचा आहे. 'मोफत'च्या राजकारणात सरावलेल्या दिल्ली सरकारला आता 'शाश्वत' राजकारणाची परीक्षा द्यावी लागणार आहे. सबसिडीचे गाजर दाखवून मते मिळवणे सोपे असते, पण प्रगत तंत्रज्ञानाचा पाया रचून भविष्यातील पिढीला स्वच्छ हवा देणे हे कठीण काम आहे. दिल्लीचा हा 'ई-प्रवास' कागदावरून रस्त्यावर येताना त्याला अनेक वळणे पार करावी लागणार आहेत. केवळ बॅटरी बदलून चालणार नाही, तर प्रशासकीय मानसिकतेचे 'व्होल्टेज'ही वाढवावे लागेल. अन्यथा, 'इलेक्ट्रिक क्रांती' ही केवळ वीज बिल आणि सबसिडीच्या आकड्यांच्या खेळातच अडकून पडेल. प्रदूषणाच्या धुक्यात हरवलेल्या दिल्लीला आता स्थिर दाबाच्या वीज प्रवाहाची आणि त्याहूनही अधिक 'स्थिर' धोरणाची गरज आहे.

# शिलकीचा आभास आणि तुटीचे कटू वास्तव



» **जागतिक अर्थव्यवस्थेच्या हिंदोळ्यावर स्वार होताना भारतीय व्यापाराची नौका प्रतिकूल वाऱ्यांशी झुंजत आहे. निर्यातीचे आकडे आणि तुटीचे वाढते विवर यांच्यातील दरी रुंदावत असताना, वास्तवाचा वेध घेणे अनिवार्य ठरते.**

जागतिक व्यापाराच्या पटलावर भारताची कामगिरी म्हणजे 'दोन पावले पुढे आणि चार पावले मागे' अशी काहीशी होताना दिसत आहे. नुकतीच प्रसिद्ध झालेली व्यापाराची आकडेवारी पाहता, भारतीय अर्थव्यवस्थेच्या तथाकथित 'वाघा'ला जागतिक बाजारपेठेच्या पिंजऱ्यात नेमके कोठे अडकून पडल्यासारखे वाटते आहे, याचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. एका अहवालात अधोरेखित केल्याप्रमाणे, सरलेले वर्ष हे केवळ आर्थिक आव्हानांचे नव्हते, तर ते धोरणात्मक चाचपणीचेही होते. मात्र, या चाचपणीत आपण किती यशस्वी झालो, याचे उत्तर निर्यातीच्या आकड्यांत शोधण्याऐवजी वाढत्या व्यापार तुटीच्या भीषण वास्तवात दडलेले आहे.

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचे आरोग्य हे त्या देशातून बाहेर जाणाऱ्या मालाच्या जहाजांवरून ठरत असते. दुर्दैवाने, भारताच्या बाबतीत ही जहाजे काहीशी रिकामी किंवा अपेक्षेपेक्षा कमी वजनाची आहेत, असे म्हणावे लागते. गेल्या वर्षभरात जागतिक स्तरावर भू-राजकीय तणाव वाढले आहेत. युक्रेन-रशिया युद्ध असो वा लाल समुद्रातील हुथी बंडखोरांचा उपद्रव, या सर्वांचा फटका जागतिक पुरवठा साखळीला बसला आहे. पण प्रश्न असा उरतो की, हे संकट केवळ भारतासाठीच होते का? की आपण या संकटाचे रूपांतर संधीत करण्यात कुठेतरी कमी पडलो? वस्तूंच्या निर्यातीत झालेली घट ही चिंतेची बाब आहे. आपण सातत्याने 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत'च्या घोषणांचे ढोल बडवत असतो. मात्र, जेव्हा प्रत्यक्ष मैदानात उतरण्याची वेळ येते, तेव्हा आपल्या निर्यातीचा कणा असणारे कापड, चामडे आणि अभियांत्रिकी वस्तूंचे क्षेत्र थंडावलेले दिसते. इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील निर्यातीत काही अंशी वाढ झाली आहे, ही समाधानाची बाब असली तरी ती संपूर्ण चित्र बदलण्यासाठी पुरेशी नाही. विशेषतः मोबाईल उत्पादनात आपण प्रगती केली असली, तरी त्यातील सुटे भाग अद्यापही आयातीवरच अवलंबून आहेत.

सेवा क्षेत्राची निर्यात ही भारतीय अर्थव्यवस्थेसाठी नेहमीच 'तारणहार' ठरली आहे. माहिती तंत्रज्ञान आणि इतर व्यावसायिक सेवांनी भारताला जागतिक स्तरावर मान मिळवून दिली. पण सेवा क्षेत्राच्या जोरावर किती काळ तूट भरून काढणार? वस्तूंच्या व्यापारातील तूट जेव्हा सेवा क्षेत्राच्या नफ्यालाही गिळंकृत करू लागते, तेव्हा अर्थव्यवस्थेचा पाया डळमळीत होऊ लागतो. गेल्या वर्षात वस्तूंच्या आयातीचा आकडा ज्या वेगाने वाढला, त्या तुलनेत निर्यात खुंटली आहे.

येथे कळीचा मुद्दा हा आहे की, जागतिक बाजारपेठेत आता 'संरक्षणवाद' पुन्हा डोके वर काढत आहे. अमेरिका असो वा युरोप, प्रत्येक देश स्वतःच्या उद्योगांना वाचवण्यासाठी भिंती उभ्या करत आहे. अशा वेळी भारताला नवीन बाजारपेठा शोधणे आणि मुक्त व्यापार करारांचा गांभीर्याने विचार करणे भाग आहे.

निर्णयक्षमतेचा हा अभाव आपल्या निर्यातीला खिळ घालत आहे. व्हिएतनाम, बांगलादेश आणि थायलंड सारखे छोटे देश ज्या चपळाईने जागतिक बाजारपेठ काबीज करत आहेत, ती चपळाई आपल्या धोरणकर्त्यांमध्ये का दिसत नाही, हा खरा प्रश्न आहे.

सत्ताधारी वर्गाकडून अनेकदा जागतिक मंदीचे कारण पुढे केले जाते. जागतिक मागणी घटली हे सत्य असले तरी, त्याच काळात इतर उदयोन्मुख अर्थव्यवस्थांनी आपला वाटा कसा राखला, याचे आत्मपरीक्षण व्हायला हवे. शाश्वत प्रगतीसाठी आयातीवरील अवलंबित्व कमी करून उत्पादकता वाढवण्याशिवाय पर्याय नाही.

आज भारतासमोर सर्वात मोठे आव्हान हे 'चायना प्लस वन' या संधीचा लाभ घेण्याचे आहे. जग चीनला पर्याय शोधत आहे, पण तो पर्याय भारतच असेल याची खात्री अद्यापही जागतिक गुंतवणूकदारांना वाटत नाही. याचे कारण आपल्याकडील क्लिष्ट श्रम कायदे, जमिनीच्या उपलब्धतेतील अडचणी आणि पायाभूत सुविधांवरील वाढणारा खर्च हे आहे. जोपर्यंत आपण जमिनीवरचे वास्तव बदलत नाही, तोपर्यंत निर्यातीचे आकडे कागदावरच नाचत राहतील.

व्यापार म्हणजे केवळ देण्याघेण्याचे व्यवहार नव्हेत, तर ते देशाच्या आर्थिक सामर्थ्याचे प्रतिबिंब असते. गेल्या वर्षातील अस्थिरता ही केवळ 'ट्रेलर' आहे. आगामी काळात जागतिक अर्थकारण अधिक गुंतागुंतीचे होणार आहे. अशा वेळी आपण केवळ 'विकसित भारत २०२४' च्या स्वप्नाळू विश्वात रमणार आहोत की, निर्यातीच्या आघाड्यांवरील उणिवा दूर करून जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कंबर कसणार आहोत, यावरच देशाचे भविष्य अवलंबून आहे. व्यापारातील शिलकीचा आभास निर्माण करण्यापेक्षा, तुटीचे वास्तव स्वीकारून त्यावर जालीम उपाय करणे, हीच काळाची गरज आहे. अन्यथा, जागतिक व्यापाराच्या महासागरात आपली नौका भरकटायला वेळ लागणार नाही.

## कौशल्यम प्रकल्पातून रोजगाराच्या नव्या संधी

### महापौर रवी लांडगे यांचे प्रतिपादन

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** कौशल्याधारित शिक्षण आणि रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी कौशल्यम लाईटहाऊससारख्या प्रकल्पांची मोठी गरज असल्याचे प्रतिपादन रवि लांडगे यांनी केले. प्रत्येक तरुण-तरुणीला रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महापालिका विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

निगडीतील यमुनानगर परिसरात सुरू असलेल्या कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्पाची महापौरांनी पाहणी करून प्रशिक्षण प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी





प्रशिक्षणार्थी युवक-युवतींशी संवाद साधत त्यांच्या अनुभवांची माहिती घेतली. प्रकल्पातून यशस्वी ठरलेल्या युवकांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचे कौतुकही करण्यात आले. या पाहणीदरम्यान उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्य उत्तम केंदळे, अनिल घोलप, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांच्यासह लाईट हाऊस कम्युनिटीजच्या सीईओ अमृता बहुलेकर आणि प्रकल्प प्रमुख दीपिका केडिया उपस्थित होत्या.

महापौर लांडगे म्हणाले की, बदलत्या काळानुसार कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण देणे आवश्यक असून, अशा प्रकल्पांमुळे युवकांना केवळ नोकरीच नव्हे तर स्वावलंबी होण्याची संधी मिळत आहे. भविष्यात अशा उपक्रमांचा विस्तार करून अधिकाधिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात शिवमूर्ती सोनटक्के, सुमेधा ढाके, सुमित कुंभकरण, शंकर प्रसाद, रुचा लोंढे, अक्षय माने या नोकरी मिळालेल्या युवकांसह ओम सुर्वे, सचिन जाधव, प्रीती कोळेकर आणि आरती होलाडे या कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या युवक-युवतींचा गौरव करण्यात आला.

## 'मिसिंग लिंक' १ मेपासून खुली होण्याची शक्यता

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**लोणावळा :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील प्रवास अधिक वेगवान आणि सुरक्षित करणारा 'मिसिंग लिंक' प्रकल्प अंतिम टप्प्यात पोहोचला असून, येत्या १ मे (महाराष्ट्र दिन) पासून हा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यादृष्टीने कामांना सध्या युद्धपातळीवर गती देण्यात आली आहे.

लोणावळा-खंडाळा घाट परिसरातील कठीण भूप्रदेश, तीव उतार, धोकादायक वळणे आणि वारंवार निर्माण होणारे दाट धुके यामुळे द्रुतगती मार्गाच्या मूळ बांधकामावेळी काही भाग थेट जोडता आला नव्हता. त्यामुळे या मार्गावर वाहतूक कोंडी आणि अपघातांची शक्यता कायम होती. आता 'मिसिंग लिंक' पूर्ण झाल्याने ही अडचण दूर होणार असून, घाटातील अवघड वळणांचा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होईल. या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे प्रवासाचा कालावधी ३० मिनिटांनी कमी होणार आहे. ६ किलोमीटर अंतरही कमी होणार असल्याने इंधनाची मोठी बचत होईल. दररोज सुमारे एक कोटी रुपयांचे इंधन वाचेल, असा अंदाज आहे.

या प्रकल्पाची अभियांत्रिकी वैशिष्ट्येही लक्षवेधी आहेत. प्रकल्पात दोन भव्य बोगदे बांधण्यात आले असून, त्यातील सुमारे ९ किलोमीटर लांबीचा बोगदा देशातील सर्वांत लांब बोगदा ठरणार आहे. सुमारे २३.५ मीटर रुंदीचा हा बोगदा जगातील मोजक्या सर्वाधिक रुंद बोगद्यांपैकी एक मानला जातो.

## सारथी प्रणाली सक्षम करण्याचे दिले निर्देश

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची 'सारथी' ही डिजिटल नागरिक सेवा प्रणाली अधिक कार्यक्षम आणि परिणामकारक करण्यासाठी महापौर रवि लांडगे यांनी प्रशासनाला स्पष्ट आणि कडक निर्देश दिले आहेत. नागरिकांच्या तक्रारींचे जलद आणि समाधानकारक निवारण व्हावे, यासाठी 'सारथी २.०' विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महापौरांनी आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात सध्याची 'सारथी' प्रणाली केवळ तक्रार नोंदवण्यापुरती मर्यादित न राहता ती अधिक व्यापक 'स्मार्ट गव्हर्नन्स प्लॅटफॉर्म' म्हणून विकसित करण्याची गरज अधोरेखित केली आहे. यासोबतच नागरिकांना वापरण्यास सोपी अशी प्रणाली तयार करण्यासाठी सुधारणा, सर्व सेवांसाठी वेळमर्यादा आणि डेटा सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करण्यावरही भर देण्यात आला आहे. 'सारथी २.०' विकसित करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे तक्रार वर्गीकरण, डेटा विश्लेषणासाठी प्रेडिक्टिव ॲनालिटिक्स आणि नागरिकांना त्वरित मार्गदर्शन देण्यासाठी चॅटबॉट सुविधा समाविष्ट करण्याचा विचार आहे. ६० दिवसांत सुधारित प्रणालीचा रोडमॅप सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

## मावळमध्ये प्रस्तावित एमआयडीसीला विरोध

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** मावळ तालुक्यातील करुंज, बऊर ग्रामपंचायत तसेच बाह्मणवाडी परिसरात आयोजित विशेष ग्रामसभांमध्ये प्रस्तावित एमआयडीसी प्रकल्पासाठी करण्यात येणाऱ्या जमीन संपादनास ग्रामस्थांनी एकमुखाने विरोध दर्शविला. शेतकऱ्यांच्या अडचणी, भविष्यातील परिणाम आणि उदरनिर्वाहाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करत या प्रकल्पाविरोधात ठाम भूमिका घेण्यात आली.

ग्रामसभेत मंजूर करण्यात आलेल्या ठरावानुसार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मार्फत शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करू नयेत, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली. यासोबतच शेतकऱ्यांना



देण्यात आलेल्या नोटिसा तात्काळ मागे घेण्याचीही मागणी करण्यात आली.

ग्रामस्थांनी सांगितले की, २००६ पासून या भागातील जमिनींवर विविध प्रकारचे निर्बंध आणि शिक्के लावण्यात आले आहेत, ज्याचा शेती आणि व्यवहारांवर मोठा परिणाम झाला आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमिनी एमआयडीसी क्षेत्रात समाविष्ट करू नयेत, तसेच संपादन होणाऱ्या बागायती जमिनींची प्रत्यक्ष पाहणी करूनच पुढील निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली.

याशिवाय, १९९५-९६ दरम्यान द्रुतगतीमार्गासाठी या भागातील मोठ्या प्रमाणावर जमीन आधीच संपादित करण्यात आली आहे. उर्वरित जमिनीवरच अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह सुरू असून, त्या देखील संपादित झाल्यास शेतकरी पूर्णपणे भूमिहीन होतील, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली.

करुंज, बऊर, राऊतवाडी आणि लोखंडवाडी परिसरातील ग्रामस्थांनी या प्रस्तावित एमआयडीसी प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवत तो तात्काळ रद्द करण्याची मागणी केली. गेल्या ३० ते ४० वर्षांपासून या भागात वास्तव्यास असलेल्या शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त होण्याची शक्यता असल्याचेही ग्रामसभेत अधोरेखित करण्यात आले. या विरोधानंतर प्रशासन पुढील भूमिका काय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नेहरूनगरमध्ये जीवघेणा हल्ला; चार जणांविरुद्ध गुन्हा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडमधील नेहरूनगर परिसरात मध्यरात्री घडलेल्या मारहाणीच्या गंभीर घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यापैकी दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १४ एप्रिल रोजी रात्री सुमारे ११.४५ वाजण्याच्या सुमारास नेहरूनगर येथील पवार पेट्रोल पंपाजवळील बालाजी ट्रेडर्स दुकानासमोर ही घटना घडली. फिर्यादी दानिश आरिफ शेख (वय १८, रा. नेहरूनगर, पिंपरी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी संगनमत





करून त्यांच्यावर तसेच त्यांच्या नातेवाईकांवर हल्ला केला.

प्राथमिक वादानंतर आरोपींनी शिवीगाळ करत हाताबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर एका आरोपीने सिमेंटचा तुकडा उचलून "इसको अब खत्म कर देंगे" अशी धमकी देत फिर्यादीच्या डोक्यावर प्रहार केला. या हल्ल्यात दानिश शेख गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी शाहबाज उर्फ टिपू शहा (३०), इरफान शहा (३२), सुरज उर्फ आसिफ शेख (२१) आणि राम दुग्गा चौधरी (२५) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०९, ११५, ३५२ आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी आरोपी दोघा आरोपींना अटक केली असून, इतरांचा शोध सुरू आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडे करत आहेत.

**बेकायदेशीर पिस्तूल प्रकरणी गुन्हा दाखल**

**पिंपरी:** पिंपरी परिसरात बेकायदेशीर पिस्तूल बाळगल्याप्रकरणी पोलिसांनी कारवाई करत एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे, हे शस्त्र एका अल्पवयीन मुलाकडून जप्त करण्यात आल्याने प्रकरण अधिक गंभीर मानले जात आहे.

ही घटना १५ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ५.२० वाजण्याच्या सुमारास पिंपरी येथील स्मशानभूमीसमोरील येथे घडली. याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस शिपाई रोहित रघुनाथ वाघमारे यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, एका अल्पवयीन मुलाकडून सुमारे ५० हजार ५०० रुपये किमतीचे देशी बनावटीचे पिस्तूल विनापरवाना जप्त करण्यात आले. चौकशीत संबंधित मुलाने हे पिस्तूल प्रतापसिंग (वय अंदाजे ५४, रा. मध्य प्रदेश) याच्याकडून घेतल्याचे सांगितले. दरम्यान, शहरात १५ ते २८ एप्रिल २०२६ या कालावधीत कोणतेही घातक शस्त्र बाळगण्यास मनाई आदेश लागू असतानाही आरोपीने त्याचे उल्लंघन केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, प्रतापसिंग याला अटक करण्यात आलेली नसून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे.

**मेरीटाईम इन्स्टिट्यूटमध्ये निष्काळजीपणामुळे मृत्यू**

**मावळ:** मावळ तालुक्यातील इंदोरी येथील एका मेरीटाईम इन्स्टिट्यूटमध्ये गंभीर निष्काळजीपणामुळे २० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी इन्स्टिट्यूटच्या प्राचार्यासह संबंधित जबाबदार व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ७.३० वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. विशाल बाबूराम वर्मा (वय २०) हा व्यायामासाठी इन्स्टिट्यूटच्या मैदानावर गेला असताना मैदानावर बसवलेला लोखंडी बास्केटबॉल पोल अचानक कोसळला. हा पोल थेट त्याच्या डोक्यावर पडल्याने त्याला गंभीर दुखापत झाली आणि त्याचा मृत्यू झाला. संबंधित बास्केटबॉल पोल अत्यंत जुना आणि गंजलेला होता. त्याची वेळोवेळी देखभाल किंवा दुरुस्ती करण्यात आलेली नव्हती. या निष्काळजीपणामुळेच ही घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी विशालचा नातेवाईक अशोक बाबूराम वर्मा (वय २७) यांनी दिलेल्या तक्रारीवरून इन्स्टिट्यूटचे प्राचार्य संजीत कांगो (वय ५९) तसेच इतर संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सांगवीत दोन तरुणांकडून पिस्तुल व काडतुसे जप्त

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** सांगवी परिसरात पोलिसांनी पहाटेच्या सुमारास धाड टाकत दोन तरुणांकडून पिस्तुल आणि जिवंत काडतुसे जप्त केली.

या कारवाईत दोघांना अटक करण्यात आली असून, शहरात बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांची मोहीम अधिक तीव्र झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

ही कारवाई १५ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ओंध जिल्हा रुग्णालयाजवळील पावर हाऊस परिसरात करण्यात आली. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार संशयितांवर लक्ष ठेवण्यात आले होते.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे साहिल दत्तात्रय सास्ते (वय १९, रा. कोथरूड) आणि साई विठ्ठल वाघमारे (वय १९, रा. कोथरूड) अशी आहेत.

पोलिसांनी आरोपींकडून दोन देशी बनावटीची पिस्तुले, चार जिवंत काडतुसे आणि एक दुचाकी असा एकूण सुमारे १ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

संबंधितांकडे शस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना नसल्याचेही तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियम आणि इतर संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### महावितरणच्या डीपीला भीषण आग

**लोणी काळभोर :** ग्रामपंचायत हद्दीतील तरवडी रानमळा येथे महावितरणच्या डीपीला शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागल्याची घटना गुरुवारी (ता. १६) दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास घडली. स्थानिक शेतकऱ्यांनी सुमारे तीन तासांच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणत मोठा अनर्थ टाळला. मिळालेल्या माहितीनुसार, डीपीमध्ये अचानक शॉर्टसर्किट होऊन आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले. परिसरात कोरडी झुडपे व शेती असल्याने आग वेगाने पसरण्याची भीती निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळताच स्थानिक शेतकरी तात्काळ घटनास्थळी धावले. सागर काळभोर यांनी तत्परता दाखवत महावितरण कार्यालयाशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. त्यानंतर वायरमन गिरी यांना कळवून वीजपुरवठा तातडीने बंद करण्यात आला. त्यामुळे संभाव्य मोठा अपघात टळला.

### कौटुंबिक वादातून मुलावर हल्ला

**फुरसुंगी :** घरगुती वाद टोकाला गेल्याने आईला मारहाण थांबवण्यासाठी गेलेल्या मुलालाच गंभीर जखमी व्हावे लागल्याची धक्कादायक घटना बुधवारी (ता. १५) रात्री सुमारे सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी वडिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आर्यन प्रभाकर टिळेकर (वय २३, रा. भेकराईनगर) हा मांजरी येथील लॉ कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. बुधवारी रात्री तो घराबाहेर पार्किंगमध्ये असताना घरातून आई-वडिलांच्या वादाचा आवाज ऐकू आला. त्यानंतर तो तत्काळ घरात गेला असता, त्याचे वडील प्रभाकर टिळेकर हे आई मनिषा टिळेकर यांना मारहाण करत असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. वाद थांबवण्यासाठी आर्यन मध्ये पडला असता, संतापाच्या भरात प्रभाकर टिळेकर यांनी किचनमधील लोखंडी तव्याने त्याच्या डोक्यात प्रहार केला. यात आर्यन गंभीर जखमी झाला आहे.

#### कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यात पाणी साठा

# मलघेवाडीतील शेतकऱ्यांचा पाणीप्रश्न सुटला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** मलघेवाडी (ता. खेड) येथे भीमा नदीवर कोल्हापूर पद्धतीच्या छोट्या बंधाऱ्याचे काम नुकतेच पूर्ण झाले असून बंधाऱ्यात पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे परिसरातील शेतीचा पाणीप्रश्न सुटल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

मलघेवाडी, मांजरेवाडी (पिंपळ) आणि शिरोली परिसरात उन्हाळ्यात सातत्याने पाणीटंचाई जाणवत होती. या पार्श्वभूमीवर शंकर मलघे, भगवान मलघे, राहुल मलघे, साहेबराव मलघे, गुलाब मलघे, सतीश मलघे यांच्यासह ग्रामस्थांनी पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नातून सन २०२१ मध्ये तत्कालीन आमदार बाबाजी काळे यांच्या माध्यमातून जिल्हा नियोजन समितीतून सुमारे एक कोटी रुपये निधी या बंधाऱ्यासाठी मंजूर करण्यात आला होता. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे तसेच ठेकेदाराने काम अर्धवट सोडल्याने प्रकल्प रखडला होता. नंतर दुसऱ्या ठेकेदारामार्फत उर्वरित काम पूर्ण करण्यात आले असून लोखंडी दरवाजे बसवून पाणी साठवण सुरू करण्यात आली आहे.

या पाणीसाठ्यामुळे परिसरातील शेतीला उन्हाळ्यात दिलासा मिळणार असून विहिरींची पाणीपातळी टिकून राहण्यास मदत होणार आहे. तसेच काही शेतकऱ्यांच्या शेतजमिनी नदीपलिकडे असल्याने पावसाळ्यात ये-जा अडथळलेली असायची. बंधाऱ्यावरून आता विद्यार्थ्यांसह शेतकऱ्यांची वाहतूक व शेतमालाची ने-आण सुरळीत होणार असल्याने मोठा फायदा होणार आहे.

दरम्यान, आमदार बाबाजी काळे हे एका दशक्रिया कार्यक्रमानिमित्त मलघेवाडी येथे आले असता त्यांनी बंधाऱ्याची पाहणी करून समाधान व्यक्त केले. त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत प्रकल्पाबाबत माहिती घेतली. या वेळी बाजार समितीचे संचालक जयसिंग भोगाडे, हनुमंत कड, पंचायत समिती सदस्य दिलीप डुबे, बँकेचे उपाध्यक्ष रामदास धनवटे, संचालक दत्ता भेगडे, दशरथ गाडे, बाळासाहेब मांजरे, प्रविण मलघे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंचर नगरपंचायतीकडून दिव्यांग कल्याण निधीचे वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून मंचर नगरपंचायतीमार्फत दिव्यांग बांधवांसाठी २०२५–२०२६ या वर्षाचा दिव्यांग कल्याण निधी वितरित करण्यात आला. दिव्यांग कल्याण व मागासवर्गीय समितीचे सभापती वसंतराव बाणखेले (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. त्यांनी निधी वितरण प्रक्रियेतील प्रशासकीय तरतुदींबाबत उपस्थितांना माहिती दिली.

या योजनेसाठी दिलेल्या मुदतीत एकूण १८४ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी छाननीनंतर १७९ लाभार्थी पात्र ठरले असून प्रत्येक लाभार्थ्याला ४१८८ रुपये इतका निधी वितरित करण्यात येणार आहे. नगरपंचायत कार्यालय पहिल्या मजल्यावर असल्याने व तेथे लिफ्ट सुविधा उपलब्ध नसल्यामुळे दिव्यांग बांधवांना अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर लिफ्ट बसविण्यासाठी तांत्रिक मान्यता मिळाली असून लवकरच निविदा प्रक्रिया राबवून लिफ्ट बसविण्यात येईल, अशी माहिती सभापती बाणखेले यांनी दिली.

नगराध्यक्षा राजश्री गांजाळे यांनी दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांवर उपाययोजना करणे तसेच कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासन सतत सजग राहील, अशी ग्वाही दिली.

या प्रसंगी नगरसेवक शिवाजी राजगुरू, विकास जाधव, रविकिरण आवळे, मालती थोरात, अंजली बाणखेले, वंदना बाणखेले उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते काही दिव्यांग बांधवांना गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास प्रशांत बाणखेले, राजू मेहेर, संगीत काळे, फरहान अली मीर, सुजात अली इनामदार, अनिता पारेख आदी दिव्यांग बांधव उपस्थित होते.

## उजनीतून भीमा नदीत पाणी सोडण्याचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**इंदापूर :** उजनी धरण येथून भीमा नदीमध्ये शनिवार (दि. १८) पासून पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भीमा नदीकाठच्या गावांतील पिण्याच्या पाणीपुरवठा योजना तसेच जनावरांसाठी पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या बैठकीत उजनी धरणातून दोन आवर्तनांत पाणी सोडण्यासाठी एकूण ७ टीएमसी पाणी राखून ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, सोलापूरचे जिल्हाधिकारी तसेच संबंधित लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

सध्याच्या परिस्थितीत भीमा नदीकाठच्या अनेक गावांचा पाणीपुरवठा नदीवर अवलंबून असल्याने शनिवारपासून नदीपात्रात पाणी सोडण्याचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाई टाळण्यासाठी हा उपाय करण्यात येत आहे.

दरम्यान, उजनी धरणात सध्या सुमारे ८० टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असून, तो गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे २० टीएमसीने अधिक आहे. पहिल्या आवर्तनानंतर दुसरे आवर्तन जून महिन्यात सोडण्याबाबत मे महिन्यात जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन अंतिम निर्णय घेतला जाणार असल्याचेही बैठकीत नमूद करण्यात आले.

यावेळी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दिलेला पाण्याचा कोटा पावसाळ्यापर्यंत पुरेल, याची खबरदारी घ्यावी तसेच पिण्याच्या पाणीपुरवठा योजनांना पाणी कमी पडू नये, अशी मागणी हर्षवर्धन पाटील यांनी केली होती. ही मागणी प्रशासनाने मान्य केल्याचे त्यांनी सांगितले. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## भैरवनाथ पतसंस्थेत कोट्यवधींचा अपहार

#### ३६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** खेड तालुक्यातील वाकी बुद्रुक येथील भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत सुमारे ६ कोटी ५३ लाख ९२ हजार ४२ रुपये इतक्या रकमेचा अपहार झाल्याप्रकरणी संचालक मंडळासह एकूण ३६ जणांविरुद्ध चाकण उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्यात संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष, सर्व संचालक, खेड बाजार समितीचे माजी उपसभापती तसेच ग्रामपंचायतीचे आजी-माजी पदाधिकारी यांचा समावेश आहे. याप्रकरणी सहकारी संस्था, नागरी बँका विभागाच्या प्रथम विशेष लेखापरीक्षक अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, २०१३–१४ ते २०१७–१८ या कालावधीत हा आर्थिक गैरव्यवहार घडल्याचे स्पष्ट झाले आहे. चौकशीत संस्थेतील



निधीचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणात अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पतसंस्थेचे संचालक व इतर काही जण अशा एकूण ३६ जणांनी कट रचला. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी पतसंस्थेतील सोनेतारण कर्ज, मालमत्ता तारण कर्ज, वैयक्तिक कर्ज, जामीनकी कर्ज, वाहन तारण कर्ज, ठेवतारण कर्ज आदी व्यवहारांमध्ये जमा पावत्यांच्या रकमा दैनंदिन व्यवहारात जमा न घेणे, बँकेतून आणलेल्या रोख रकमा संस्थेत जमा न दाखविणे, बँक भरणा नावे दर्शविणे मात्र बँकेत प्रत्यक्ष जमा नोंद नसणे, बचत ठेव खात्यांमधून बोगस सह्यांद्वारे रकमा काढणे, बनावट खर्च नोंदी टाकणे, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेत गुंतवणूक दर्शविणे मात्र त्याबाबत संस्थेच्या दप्तरी कोणतेही पुरावे नसणे, दैनंदिन शिल्लक कमी असताना जादा रक्कम खर्च दाखवून हातातील शिल्लक घटविणे, तसेच रोजकिर्दीची आरंभीची शिल्लक कृत्रिमरीत्या कमी दाखविणे अशा विविध प्रकारे ठेवीदारांची फसवणूक करण्यात आली. खोटे व बनावट दस्तऐवज तयार करून ठेवीदारांचा विश्वासघात केल्याचेही निष्पन्न झाले आहे.

गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींमध्ये रामदास हिरामण कड, तुकाराम पिराजी टोपे, किसन सोपान गारगोटे, बाळासाहेब पंडित गारगोटे, रवींद्र नामदेव गारगोटे, अनिल गोविंद टोपे, शिवाजी बाबूराव जरे, काळूराम पांडुरंग टोपे, राजाराम किसन टोपे, सुरेश रंगनाथ लोखंडे, दत्तात्रेय वाल्मीक गोरे, शांताराम बापू जगताप, विमल बबन गारगोटे, रामदास ज्ञानेश्वर जाधव, गोरख भागुजी टोपे, सुरेखा लक्ष्मणराव टोपे, मारुती ज्ञानोबा गारगोटे, राहुल रामदास टोपे, दत्तात्रय संतू टोपे, अंकुश रामदास जरे, नीलेश हनुमंत टोपे, सुरेश शिवाजी टोपे, संतोष दत्तात्रय टिपरे, सुरेखा लहू गारगोटे, सुरेखा संजय टोपे, काळुराम लक्ष्मण गारगोटे, शिवाजी दगडू टोपे, सूरज लक्ष्मण टोपे, सुरेखा लक्ष्मण टोपे, सारिका रोहिदास गारगोटे, रोहिदास तुकाराम गारगोटे, सुरेखा सुरेश लोखंडे, अनिता काळुराम गारगोटे, विशाल दत्तात्रय पवळे, रामदास संतू टोपे (सर्व रा. वाकी बुद्रुक, ता. खेड) यांचा समावेश आहे.

या व्यवहारामुळे पतसंस्थेसह खातेदार आणि सभासदांची मोठी फसवणूक झाली आहे. सहकारी पतसंस्थांमधील आर्थिक गैरव्यवहाराचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून पुढील तपास चाकण उत्तर पोलीस करत आहेत.

## वळतीत डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील वळती गावात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमासाठी पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या वेळी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष धोंडीभाऊ भोर, सरपंच आनंद वाव्हळ, भागडीचे सरपंच गोपाळ गवारी, बाबाजी लोखंडे, शिवाजी लोखंडे, पोलीस पाटील प्रकाश लोंढे पाटील, गणपत लोंढे, तबाजी लोखंडे, बन्सी आजाब, अर्जुन भोर, डॉ. भगवान लोखंडे, धनंजय आजाब यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी सरपंच आनंद वाव्हळ यांनी प्रास्ताविक करत डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेतला. समानता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा अंगीकार करण्याचे त्यांनी आवाहन केले.

यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी आपल्या भाषणात डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, बाबासाहेबांनी दिलेल्या शिकवणीनुसार समाजात सकारात्मक बदल घडवणे आवश्यक आहे. तसेच गावातील एकोपा टिकवून ठेवत तंटामुक्त गाव उभारण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे, असा संदेश त्यांनी दिला. पोलीस पाटील प्रकाश लोंढे पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## वांग्यांचे दर कोसळले

#### शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** बाजारात वांग्यांच्या दरात मोठी घसरण झाल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सध्या दहा किलो वांग्यांना केवळ ७० ते १०० रुपये इतकाच दर मिळत असून हा भाव उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याचे चित्र आहे.

गेल्या महिनाभरापासून हे दर स्थिर कमी पातळीवर असून, यापूर्वी दहा किलोमागे सुमारे २०० रुपये दर मिळत होता. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय घट झाली आहे.

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे वांग्याच्या पिकावर शेंडे अळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या किडीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना वारंवार कीटकनाशक फवारणी करावी लागत असून, त्यामुळे उत्पादन खर्चात वाढ झाली आहे. खर्च वाढत असताना बाजारभाव घसरल्याने शेतकरी दुहेरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

नागपूर येथील शेतकरी प्रकाश वाघ यांनी यंदा वांग्याचे पीक घेतले असून उत्पादन समाधानकारक येत आहे. दररोज तोडणी सुरू असली तरी बाजारात अपेक्षित दर मिळत नसल्याने त्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. “उत्पादन चांगले असूनही बाजारभाव समाधानकारक नाहीत. त्यामुळे मेहनतीचे योग्य मूल्य मिळत नाही,” अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

वाढता उत्पादन खर्च, किडीचा प्रादुर्भाव आणि घसरलेले बाजारभाव या तिहेरी संकटामुळे वांग्याचे उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले असून शासनाने तातडीने लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## लोणीत जलतारा प्रकल्पाचा शुभारंभ



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** लोणी (ता. आंबेगाव ) येथे गुरुवारी पोलीस पाटील संदीप आढाव यांच्या शेतामध्ये पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी आणि भूगर्भातील जलसाठा वाढवण्यासाठी 'जलतारा चळवळीचा' शानदार शुभारंभ करण्यात आला.

काही दिवसापूर्वी ग्रामस्थांनी सरपंच डॉ.सावळेराम नाईक यांच्या आवाहनाला साथ देऊन जलसारा संशोधन केंद्र - विठ्ठला फॉर्म, वाटूर. ता. परतुर जि. जालना या ठिकाणी डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांच्या शेतीमध्ये जाऊन जलतारा प्रकल्पाचे पाहणी करून आले होते.

लोणीच्या पश्चिमेला शेतीसाठी पाण्याचा स्त्रोत कमी असल्याने महाराष्ट्र राज्याचे महसूल विभागाचे सहसचिव डॉ. कैलास गायकवाड व लोणीचे सरपंच डॉ. सावळेराम नाईक यांच्या मार्गदर्शक सूचने नुसार ग्रामस्थांनी अभ्यास दौरा आयोजित केला होता. त्यानुसार लोणी गावचे पोलीस पाटील संदीप आढाव यांनी स्वतःच्या शेतीमध्ये प्रथम हा प्रयोग सुरू केला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन महसूल विभागाचे सहसचिव डॉ. कैलास गायकवाड यांचे हस्ते झाले. यावेळी माजी विद्यार्थी विकास प्रबोधनीचे खजिनदार बाळासाहेब गायकवाड, प्रकाश गायकवाड, शरद सहकारी बँकेचे संचालक अशोक आदक पाटील, ग्रामपंचायत उपसरपंच राजेंद्र वामन वाळुंज, रंगनाथ वाळुंज पाटील, उद्योजक लहू गायकवाड, खरेदी विक्री संघाचे माजी संचालक चंद्रकांत गायकवाड, समाजभूषण कैलासराव गायकवाड ग्रामपंचायत अधिकारी अनिल टेमकर, पोपट फकीरा गायकवाड विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

#### अध्यक्ष सागर पाटोळे यांची माहिती

# राजगुरुनगर सहकारी बँकेला २६ कोटी ७४ लाखांचा नफा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर :** राजगुरुनगर सहकारी बँकेने सन २०२५–२६ आर्थिक वर्षात २६ कोटी ७४ लाख रुपये इतका उच्चांकी निव्वळ नफा मिळवला असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे यांनी दिली. बुधवारी (दि. १५) आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी बँकेच्या आर्थिक कामगिरीचा आढावा सादर केला. बँकेचा ढोबळ एनपीए ४.६३ टक्क्यांवर खाली आला असून, तरतुदीनंतर निव्वळ एनपीए शून्य टक्के राखण्यात यश मिळाले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच येत्या आर्थिक वर्षात चाकण (शिक्रापूर रोड), कुरुळी आणि तळेगाव दाभाडे (ता. मावळ) येथे नवीन शाखा सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला उपाध्यक्ष रामदास धनवटे, संचालक किरण आहेर, राजेंद्र वाळुंज, दिनेश ओसवाल, गणेश थिगळे, अविनाश कहाणे, समीर आहेर, विजय डोळस, विजयाताई शिंदे, राजेंद्र सांडभोर, सचिन मांजरे, विनायक घुमटकर, महेश शेवकरी, मुख्याधिकारी शांताराम वाकचौरे, संजय ससाणे, अमृत टाकळकर, शंकर कोल्हे आदी उपस्थित होते.

बँकेने आतापर्यंत ११८२ कोटी रुपये कर्जवाटप केले असून २०५६ कोटी रुपये ठेवी गोळा केल्या आहेत. त्यामुळे बँकेचा एकूण व्यवसाय ३२३८ कोटी रुपये झाला आहे. सरत्या आर्थिक वर्षात बँकेने ९५ कोटी रुपये कर्जवाटप आणि २४३ कोटी रुपये ठेवी संकलन केले. या काळात बँकेला ५२ कोटी ६९ लाख रुपये ढोबळ नफा झाला असून त्यातून तरतुदीनंतर २६ कोटी ७४ लाख रुपये निव्वळ नफा मिळाल्याचे स्पष्ट करण्यात आले. बँकेने सभासदांसाठी अपघाती विमा संरक्षणाची रक्कम ४ लाखांवरून ५ लाख रुपये करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच आकुर्डी शाखा मोशी येथे स्थलांतरित करण्यात येणार असून आळेफाटा शाखा स्वमालकीच्या इमारतीत हलविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

बँक सिबिल स्कोरनुसार व्याज आकारणी करत असून गृह व वाहन कर्जासाठी ८.७५ ते ९.७५ टक्के व्याजदर आकारला जात असल्याचे दिनेश ओसवाल यांनी सांगितले. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत बँकेने २०२४–२५ मध्ये २४० लाभार्थ्यांना, तर २०२५–२६ मध्ये १५४ लाभार्थ्यांना अनुदानित कर्जपुरवठा केला आहे, अशी माहितीही देण्यात आली. कर्जदारांच्या स्वेच्छा विमा योजनेला उत्तम प्रतिसाद मिळत असून कुटुंब व जामीनदारांच्या सुरक्षिततेसाठी ही योजना उपयुक्त असल्याचे किरण आहेर यांनी सांगितले.

## किरकोळ वादातून मारहाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**खेड :** खेड तालुक्यातील मोशी परिसरात किरकोळ वादातून एका व्यक्तीवर तिघांनी मिळून मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला असून आरोपी सध्या फरार आहेत. ही घटना १४ एप्रिल रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली.

याप्रकरणी नंदकुमार भिमराव बिडकेर (वय ४०, रा. मोशी, ता. खेड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, आरोपींनी त्यांना रस्त्यात अडवून जुन्या वादावरून जाब विचारला. यावेळी वाद वाढत गेला आणि आरोपींनी शिवीगाळ करत त्यांना मारहाण केली. या




मारहाणीत एका आरोपीने दगडाने डोक्यावर प्रहार केल्याने फिर्यादी गंभीर जखमी झाले.

या प्रकरणी शरण बसप्पा सुबाष आनाकल (वय ३१), मालश्री आनाकल आणि सिद्धू माडगुळी यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२ आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ एप्रिल रोजी दुपारी ४.२६ वाजता गुन्हा नोंदवण्यात आला. सध्या या घटनेचा तपास पोलीस करत असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

## सारांश वृत्त

### केरळमध्ये तापमानवाढीचा धोका

**तिरुवनंतपुरम:** केरळ राज्य हवामान संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या निवेदनानुसार, भारतीय हवामान विभागाने शुक्रवारी संपूर्ण केरळमध्ये १९ एप्रिलपर्यंत उच्च तापमानाचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. तो जनतेला सावध राहण्याचा सल्ला देतो. पालक्काड जिल्ह्यातील काही भागांमध्ये कमाल तापमान सुमारे ४० अंश सेल्सिअस, कोल्लममध्ये ३९ अंश सेल्सिअस आणि कोट्टायममध्ये ३८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

### अवैध शस्त्रास्त्रे टोळीचा पर्दाफाश

**नवी दिल्ली** : दिल्ली-एनसीआर परिसरात कार्यरत असलेल्या एका अवैध शस्त्र टोळीचा पर्दाफाश केल्यानंतर, दिल्ली विद्यापीठाच्या स्कूल ऑफ ओपन लर्निंग (एसओएल) मधील एका पदवीपूर्व विद्यार्थ्याला अटक करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आरोपीने उत्तर प्रदेशातील मेरठ येथून अनेक व्यवहारांमधून ही शस्त्रे मिळवली होती आणि प्रतिस्पर्धी टोळ्यांवर प्रतिहल्ले करण्यासाठी त्यांचा वापर करण्याचा त्याचा इरादा होता. १४ एप्रिल रोजी केलेल्या छाप्यानंतर अबू तालिब (२७) नावाच्या आरोपीला अटक करण्यात आली.




### महिला आरक्षण कायद्याच्या समर्थनार्थ रॅली

**इटानगर** : पश्चिम गंगटोक महिला आरक्षण कायद्याच्या समर्थनार्थ शुक्रवारी सिक्कीमची राजधानी गंगटोक येथे हजारो महिला एका रॅलीत सहभागी झाल्या. ही मिरवणूक देवराली येथील टाटा स्टँडपासून सुरू झाली आणि पाणी हाऊस, मेट्रो पॉईंट व दारा हॉस्पिटलमधून जात पालजोर स्टेडियम येथे समाप्त झाली. या रॅलीत सहभागी झालेल्यांमध्ये नागरी समाज गटांचे सदस्य, सरकारी कर्मचारी आणि राजकीय कार्यकर्ते यांचा समावेश होता.

## अंमलबजावणीसाठी संसदेत दुरुस्त्यांवर चर्चा

# महिला आरक्षण कायदा अधिसूचित

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : संसद व राज्य विधानमंडळांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा महिला आरक्षण कायदा, २०२३ (नारी शक्ती वंदन अधिनियम) गुरुवारी अधिसूचित करण्यात आला असून १६ एप्रिल २०२६ पासून तो अंमलात आला आहे. दरम्यान, या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी २०२९ पासून करता यावी यासाठी आवश्यक दुरुस्त्यांवर लोकसभेत चर्चा सुरू आहे. शुक्रवारी दुपारी ४ वाजता या संदर्भातील मतदान अपेक्षित आहे.

कायद्याच्या अधिसूचनेनंतर लगेचच विरोधी पक्षांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मूळ कायदा अधिसूचित केल्यानंतर त्यात सुधारणा करण्यासाठी विधेयक का आणले जात आहे, असा मुद्दा काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी उपस्थित केला. डीएमकेच्या कनिमोझी यांनीही याच मुद्द्यावर आक्षेप घेत कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्याकडून स्पष्टीकरणाची मागणी केली.

सरकारकडून मात्र या प्रक्रियेचे समर्थन करण्यात आले. एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, कोणत्याही कायद्यात दुरुस्ती लागू करण्यासाठी तो कायदा प्रथम अंमलात असणे आवश्यक असते. “जर कायदा अंमलात आला नसेल, तर त्यातील दुरुस्ती कशी लागू करता येईल?” या तांत्रिक कारणास्तवच हा कायदा १६ एप्रिलपासून लागू करण्यात आल्याचे सांगण्यात आले. दुसऱ्या अधिकाऱ्यानेही ही प्रक्रिया “तांत्रिक बाबींशी संबंधित” असल्याचे नमूद केले. तथापि, कायदा अधिसूचित झाला असला तरी त्याची अंमलबजावणी तात्काळ होणार नाही, हे सरकारने स्पष्ट केले आहे. पुढील जनगणना आणि त्यानंतर होणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचनेनंतरच महिलांसाठी आरक्षण लागू करता येईल. त्यामुळे सध्याच्या लोकसभेत या कायद्याची अंमलबजावणी शक्य नसल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. अधिसूचनेनुसार, “संविधान (एकशे सहावी सुधारणा) अधिनियम, २०२३” अंतर्गत केंद्र सरकारने १६ एप्रिल २०२६ ही तारीख कायद्याच्या अंमलबजावणीसाठी निश्चित केली आहे.

सप्टेंबर २०२३ मध्ये संसदेत मंजूर झालेल्या या कायद्याला ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ म्हणून ओळखले जाते. या कायद्यानुसार लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी एक-तृतीयांश जागांचे आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

मूळ कायद्यानुसार हे आरक्षण २०२७ च्या जनगणनेनंतर आणि त्यानंतरच्या मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेनंतरच लागू होणार असल्याने त्याची अंमलबजावणी २०३४ पूर्वी अपेक्षित नव्हती. मात्र, सध्याच्या प्रक्रियेद्वारे ही अंमलबजावणी पुढे आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्यासाठी लोकसभेत सध्या ‘संविधान (एकशे एकतीसवी सुधारणा) विधेयक, २०२६’, ‘सीमांकन विधेयक, २०२६’ आणि ‘केंद्रशासित प्रदेश कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६’ ही तीन महत्त्वाची विधेयके चर्चेसाठी मांडण्यात आली आहेत.

या पार्श्वभूमीवर महिला आरक्षणाचा प्रश्न केवळ सामाजिक न्यायाचा मुद्दा न राहता, तो आता संवैधानिक प्रक्रिया, जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचना या व्यापक प्रशासकीय चौकटीशी जोडला गेला आहे. त्यामुळेच या कायद्याच्या अंमलबजावणीचा मार्ग अधिक गुंतागुंतीचा बनल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

## चंबळमधील अवैध उत्खनन हे पर्यावरणीय संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय चंबळ घडियाल अभयारण्यात नदीपात्रातील बेकायदेशीर वाळू उत्खननाला सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी “पर्यावरणीय संकट” संबोधत तीव्र चिंता व्यक्त केली. या प्रकारामुळे घडियाल संवर्धन प्रकल्पालाच गंभीर धोका निर्माण होत असल्याचा इशारा न्यायालयाने दिला.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठाने राजस्थान, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश सरकारांवर कडक शब्दांत टीका करत अवैध खाणकाम रोखण्यात झालेल्या अपयशाबद्दल नाराजी व्यक्त केली. तसेच, अवैध उत्खननासाठी वापरल्या जाणाऱ्या मार्गांवर उच्च-रिझोल्यूशन, वाय-फाय सुविधायुक्त सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे निर्देश दिले. या कॅमेऱ्यांमधील थेट प्रक्षेपण संबंधित जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक किंवा वरिष्ठ पोलीस अधीक्षक तसेच विभागीय वन अधिकाऱ्यांच्या थेट देखरेखीखाली ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सतत देखरेख राखण्याची जबाबदारीही संबंधित अधिकाऱ्यांवर सोपवण्यात आली आहे.

न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना म्हटले की, “नदीपात्रातील अनियंत्रित बेकायदेशीर खाणकामामुळे राष्ट्रीय चंबळ घडियाल अभयारण्यात पर्यावरणीय संकट निर्माण झाले असून घडियाल संवर्धनाच्या मूळ प्रकल्पालाच धोका पोहोचत आहे.” हा प्रकल्प राज्य सरकारांनीच सुरू करून त्याच्या संवर्धनाची जबाबदारी घेतली होती, याचीही न्यायालयाने आठवण करून दिली. अवैध खाणकामाशी संबंधित प्रकरणांमध्ये तातडीने कारवाई करत वाहने व यंत्रसामग्री जप्त करणे, तसेच संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देशही खंडपीठाने दिले.

या प्रकरणाची पुढील सुनावणी ११ मे रोजी होणार आहे. १३ मार्च रोजी माध्यमांतील वृत्तांची दखल घेत न्यायालयाने ‘राष्ट्रीय चंबळ अभयारण्यात अवैध वाळू उत्खनन आणि लुप्तप्राय जलचरांना असलेला धोका’ या विषयावर स्वयंप्रेरित (सुओ मोटू) याचिका दाखल करून सुनावणी सुरू केली होती.

## भगवंत मान यांचा हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चंदीगड** : अंमलबजावणी संचालनालय (ईडी) कडून राज्यमंत्री संजीव अरोरा यांच्या निवासस्थानी टाकण्यात आलेल्या धाडींनंतर पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी शुक्रवारी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. “लोकशाहीची हत्या होत असून केवळ बिगर-भाजप सरकारांनाच लक्ष्य केले जात आहे,” असा आरोप त्यांनी केला.

मान म्हणाले की, केंद्र सरकार ईडी आणि सीबीआयसारख्या तपास यंत्रणांचा राजकीय शस्त्र म्हणून वापर करत आहे. “या कारवायांवरून भाजपने आगामी पंजाब विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केल्याचे स्पष्ट होते,” असा दावा त्यांनी केला. ईडीच्या कारवाईनंतर मंत्री संजीव अरोरा यांनी तपासात पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका स्पष्ट केली.

काही दिवसांपूर्वीच केंद्रीय तपास यंत्रणांनी आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार अशोक कुमार मित्तल यांच्या पंजाब व हरियाणातील ठिकाणांवर तसेच त्यांच्या शैक्षणिक संस्थांमध्ये फेमा अंतर्गत झडती घेतली होती. मित्तल हे फगवाडा येथील लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीचे कुलपती असून अलीकडेच त्यांची राज्यसभेत ‘आप’च्या उपनेतेपदी नियुक्ती झाली आहे. मान यांनी या कारवायांचा संदर्भ देत केंद्रावर टीका करताना म्हटले की, “लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीमध्ये ३५ हून अधिक देशांतील सुमारे ४०,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, ते ‘आप’चे खासदार असल्यामुळे त्यांच्यावर अचानक कारवाई करण्यात आली. आज ऊर्जा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि उद्योग मंत्री असलेल्या संजीव अरोरा यांच्याही निवासस्थानी छापे टाकले जात आहेत. ही एक धोकादायक प्रवृत्ती आहे.” भाजपकडे पंजाबमधील सर्व ११७ विधानसभा मतदारसंघांसाठी सक्षम उमेदवार नसल्यामुळे अशा यंत्रणांचा वापर केला जात असल्याचा आरोपही मान यांनी केला.

## केंद्र सरकारवर डिंपल यादव यांची टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : समाजवादी पक्षाच्या खासदार डिंपल यादव यांनी महिला आरक्षण कायद्याबाबत विरोधी पक्षांची भूमिका सरकारकडून चुकीच्या पद्धतीने मांडली जात असल्याचा आरोप करत शुक्रवारी लोकसभेत सरकारवर निशाणा साधला. २०२३ मध्ये विरोधकांनी या विधेयकाला पाठिंबा दिला होता, याची आठवण करून देत त्यांनी सध्याच्या दुरुस्त्यांवर आक्षेप घेतला.

लोकसभेतील चर्चेदरम्यान बोलताना यादव म्हणाल्या की, समाजवादी पक्ष सध्याच्या स्वरूपातील घटनादुरुस्तीच्या बाजूने नाही. “सरकारची महिला सक्षमीकरणाबाबत खरी वचनबद्धता दिसत नाही. मतांचा वाटा घसरत असल्यामुळेच हे विधेयक आणले आहे,” असा आरोप त्यांनी केला. यादव यांनी सरकारला सवाल केला की, गेल्या अडीच वर्षांत जनगणना का घेण्यात आली नाही? “जर सरकारला खरोखरच महिला सक्षमीकरण हवे असते, तर आतापर्यंत जनगणना पूर्ण झाली असती आणि महिलांना त्यांचे हक्क मिळाले असते,” असे त्या म्हणाल्या. तसेच, सरकार “घाईघाईने” निर्णय घेत असून मतदारसंघ पुनर्रचनेचा वापर राजकीय साधन म्हणून केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक समुदायांतील महिलांना समान प्रतिनिधित्व देण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली. यापूर्वी माध्यमांशी बोलताना डिंपल यादव यांनी सरकारच्या भूमिकेवर शंका उपस्थित केली होती. “महिलांना सभागृहात प्रतिनिधित्व मिळावे, ही आमची भूमिका स्पष्ट आहे. मात्र ‘हत्तीचे दात खाण्याचे वेगळे आणि दाखवण्याचे वेगळे’ या म्हणीप्रमाणे सरकारचे वर्तन दिसत आहे,” अशी टीका त्यांनी केली. तसेच, २० वर्षे जुन्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघ पुनर्रचना करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

## भारत उदयोन्मुख जागतिक भांडवल केंद्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळाचे (सेबी) अध्यक्ष तुहीन कांता पांडे यांनी भारताला स्थिर आणि विश्वासार्ह जागतिक भांडवल केंद्र म्हणून वाढती ओळख मिळत असल्याचे सांगितले. सध्या देशाचे बाजार भांडवल सुमारे ४.४ ट्रिलियन अमेरिकी डॉलर असून, २०२५–२६ या आर्थिक वर्षात इक्विटी व कर्ज बाजारातून १५४ अब्ज अमेरिकी डॉलरपेक्षा अधिक निधी उभारण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

आयएमएफ–जागतिक बँक स्प्रिंग मीटिंगच्या पार्श्वभूमीवर सीआयआय आणि यूएस-इंडिया बिझनेस कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित उच्चस्तरीय संवाद सत्रात ते बोलत होते.

जागतिक अस्थिरतेच्या काळातही भारतीय भांडवली बाजारांची लवचिकता अधोरेखित करत त्यांनी भारताच्या वित्तीय प्रणालीची वाढती क्षमता स्पष्ट केली.

पांडे यांनी सांगितले की, २०२५ मध्ये आयपीओच्या संख्येत भारत जगात अव्वल, तर उभारलेल्या भांडवलाच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर राहण्याची शक्यता आहे. म्युच्युअल फंडांच्या व्यवस्थापनाखालील मालमत्ता सुमारे ९०० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली असून, पर्यायी गुंतवणूक निधींच्या वचनबद्धता १७५ अब्ज डॉलर ओलांडली आहे. देशाची अर्थव्यवस्था ७.६ टक्के जीडीपी वाढीच्या अंदाजावर पुढे जात असून भांडवली बाजार वित्तीय विकासाचा महत्त्वाचा आधारस्तंभ बनत असल्याचे त्यांनी नमूद केले.

परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांची मालमत्ता सुमारे ७८० अब्ज डॉलर असून ती सूचीबद्ध इक्विटीच्या सुमारे १७ टक्के आहे. कॉर्पोरेट बॉण्ड बाजारही ६५० अब्ज डॉलरच्या जवळ पोहोचला आहे.

## महिला आरक्षण विधेयकावर शशी थरूर यांची टीका

# मतदारसंघ पुनर्रचना म्हणजे राजकीय नोटाबंदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी महिला आरक्षणात सुधारणा आणि परिसीमन आयोग स्थापनेशी संबंधित प्रस्तावित विधेयकांवर शुक्रवारी तीव्र टीका केली. महिला आरक्षणाच्या अंमलबजावणीला इतर प्रक्रियांशी जोडणे म्हणजे ‘नारी शक्ती’ला “काटेरी तारेत गुंडाळण्यासारखे” असल्याची टिप्पणी त्यांनी केली.

लोकसभेतील चर्चेदरम्यान बोलताना थरूर यांनी महिला आरक्षणाबाबत सर्वपक्षीय सहमती असल्याचे मान्य केले; मात्र मतदारसंघ पुनर्रचनेशी ते जोडण्यावर आक्षेप घेतला. “दिखाऊपणाचा काळ संपला असून समान सहभागाचे युग सुरू व्हावे, यावर सर्वांचे एकमत आहे. तरीही सध्याची कायदेविषयक प्रक्रिया अस्वस्थ करणारी आहे,” असे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ‘नारी शक्ती’साठी न्याय दिल्याचा दावा केला असला, तरी महिला आरक्षणाची अंमलबजावणी संसदेचा विस्तार, २०११ च्या जनगणनेचे आकडे आणि मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडल्याने ही प्रक्रिया गुंतागुंतीची झाली आहे, असा आरोप थरूर यांनी केला. केंद्राने दोन्ही विधेयके परस्परांशी जोडण्याचा निर्णय घेतल्यामुळे “भारतीय महिलांच्या आकांक्षांना ओलीस ठेवले जात आहे,” अशी टीकाही त्यांनी केली. महिला आरक्षण तत्काळ लागू करता येऊ शकते आणि सध्याच्या संसदीय संख्याबळावर ते अमलात आणले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. मतदारसंघ पुनर्रचना ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून राजकीय सत्तेतील मोठा बदल असतो, असे नमूद करत थरूर यांनी या प्रक्रियेमुळे संघराज्य व्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो, असा इशारा दिला. “घाईघाईने मांडलेला हा प्रस्ताव नोटाबंदीप्रमाणेच ठरू शकतो. मतदारसंघ पुनर्रचना ही ‘राजकीय नोटाबंदी’ ठरेल,” असे ते म्हणाले.

थरूर यांनी मोठी व लहान राज्ये, तसेच लोकसंख्या नियंत्रण साध्य केलेली दक्षिणेकडील राज्ये आणि ते न केलेली उत्तरेकडील राज्ये यांच्यातील संभाव्य असमतोल अधोरेखित केला. पुनर्रचनेमुळे जास्त लोकसंख्या वाढ असलेल्या राज्यांना अधिक राजकीय वजन मिळू शकते, याकडे त्यांनी लक्ष वेधले. याशिवाय आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्ये आणि केंद्राच्या निधीवर अधिक अवलंबून असलेल्या राज्यांमधील विषमतेबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. संतुलन राखण्यासाठी युरोपीय संसदेतील “अवनत प्रमाणशीरता” या मॉडेलचा विचार करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

## पवन खेरा यांना अंतरिम संरक्षण नाकारले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या पत्नीवरील आरोपांशी संबंधित प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने काँग्रेस नेते पवन खेरा यांना अंतरिम संरक्षण देण्यास शुक्रवारी नकार दिला. खेरा यांनी २० एप्रिलपर्यंत सक्तीच्या कारवाईपासून संरक्षण मागितले होते; मात्र न्यायालयाने त्यांची ही मागणी फेटाळून लावली.

न्यायालयाने खेरा यांना आसाममधील सक्षम न्यायालयात जाऊन अटकपूर्व जामिनासाठी अर्ज करण्याचे निर्देश दिले. न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि अतुल एस. चांदुरकर यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान मांडण्यात आलेल्या युक्तिवादाची दखल घेत आसाममधील न्यायालयांना या प्रकरणाची तातडीने सुनावणी करण्यास सांगितले. तसेच, या प्रकरणात सर्वोच्च न्यायालय व तेलंगणा उच्च न्यायालयाने केलेल्या कोणत्याही प्रतिकूल निरीक्षणांचा विचार करू नये, असेही स्पष्ट केले. १५ एप्रिल रोजी सर्वोच्च न्यायालयाने खेरा यांना तेलंगणा उच्च न्यायालयाने दिलेल्या एका आठवड्याच्या ट्रान्झिट अटकपूर्व जामिनाच्या आदेशाला स्थगिती दिली होती. आसाम सरकारतर्फे बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी हा विषय प्रादेशिक अधिकार क्षेत्राशी संबंधित असल्याचे नमूद करत खेरा यांनी तेलंगणा उच्च न्यायालयात याचिका का दाखल केली, याबाबत स्पष्टीकरण नसल्याचा मुद्दा उपस्थित केला.

हे प्रकरण खेरा यांनी ५ एप्रिल रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत केलेल्या आरोपांमधून उद्भवले आहे. त्यांनी मुख्यमंत्री सरमा यांच्या पत्नी रिनिकी भुयान शर्मा यांच्याकडे अनेक पासपोर्ट व परदेशी मालमत्ता असल्याचा दावा केला होता. तसेच, या मालमत्तांची माहिती निवडणूक प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आलेली नसल्याचे त्यांनी म्हटले होते. शर्मा कुटुंबाने हे आरोप फेटाळून लावत ते खोटे व बनावट असल्याचे स्पष्ट केले आहे.

यापूर्वी ७ एप्रिल रोजी आसाम पोलिसांच्या पथकाने दिल्ली पोलिसांच्या मदतीने खेरा यांच्या निवासस्थानी भेट दिली होती; मात्र ते तेथे आढळले नव्हते. झडतीदरम्यान काही महत्त्वाचे साहित्य जप्त केल्याचा दावा पोलिसांनी केला आहे.

### अमली पदार्थ तस्करांची मालमत्ता जप्त

**जम्मू** : अमली पदार्थांविरोधात सुरू असलेल्या कारवाईचा एक भाग म्हणून, जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी राजौरी आणि उधमपूर जिल्ह्यांतील दोन अमली पदार्थ तस्करांची ५५ लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता जप्त केली आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. राजौरीमध्ये, अनेक प्रकरणांमध्ये आरोपी असलेल्या मुरादपूर येथील सौरभ कुमार यांच्या मालकीची सुमारे ४३.१३ लाख रुपये किमतीची एकमजली निवासी इमारत पोलिसांनी जप्त केली.

## हरिवंश राज्यसभेच्या उपसभापतीपदी बिनविरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : हरिवंश यांची राज्यसभेच्या उपसभापतीपदी शुक्रवारी बिनविरोध निवड झाली असून त्यांनी सलग तिसऱ्यांदा या पदावर आपले स्थान कायम राखले आहे. त्यांचा यापूर्वीचा कार्यकाळ ९ एप्रिल रोजी संपल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. केंद्रीय मंत्री आणि सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी त्यांच्या निवडीचा प्रस्ताव मांडला होता, जो सभागृहाने बिनविरोध मंजूर केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हरिवंश यांच्या संसदीय अनुभवाची आणि राज्यसभेच्या कामकाजातील योगदानाची दखल घेत त्यांच्या पुनर्निवडीबद्दल अभिनंदन केले. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनीही त्यांना शुभेच्छा दिल्या.

पत्रकार म्हणून कारकीर्द गाजवल्यानंतर राजकारणात प्रवेश केलेल्या हरिवंश यांची ही पुनर्निवड विशेष मानली जात आहे. राज्यसभेच्या उपसभापती पदासाठी नामनिर्देशित सदस्य म्हणून त्यांची झालेली निवड ही एक उल्लेखनीय बाब ठरली आहे.

## बंगालच्या सीमावर्ती मतदारसंघांत बदलते राजकारण

# अस्मिता, नागरिकत्व आणि ध्रुवीकरणाचा प्रभाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पश्चिम बंगालमधील बांगलादेश सीमेलगतचे मतदारसंघ पूर्वी खोलवर रुजलेल्या राजकीय आघाड्यांसाठी ओळखले जात होते. २०११ पूर्वी, डाव्या आघाडीने जमीन सुधारणा आणि मजबूत संघटनात्मक जाळ्याच्या जोरावर दक्षिण बंगालमध्ये दीर्घकाळ वर्चस्व राखले होते. हे वर्चस्व केवळ निवडणूक निकालांपुरते मर्यादित न राहता ग्रामीण सामाजिक संरचनेतही घट्ट रुजलेले होते.

बसीरहाटसारख्या मतदारसंघांत नारायण मुखर्जी यांसारख्या नेत्यांनी संघटनात्मक ताकदीच्या जोरावर सातत्याने विजय मिळवले. मात्र, या एकसंधतेच्या आड प्रादेशिक फरकही होते. मुर्शिदाबाद, मालदा आणि उत्तर दिनाजपूरमधील मुस्लिमबहुल भागांत काँग्रेसने स्थानिक नेटवर्कच्या आधारे आपली पकड टिकवून ठेवली होती.

सीमावर्ती मतदारसंघांमध्ये नागरिकत्व, स्थलांतर आणि अस्मिता या प्रश्नांचा प्रभाव ठळकपणे दिसतो. विशेषतः मतुआ समाज, बांगलादेशातून आलेल्या हिंदू स्थलांतरितांमध्ये नागरिकत्वाबाबत असुरक्षिततेची भावना कायम आहे. अनेक जण कायदेशीर अनिश्चिततेत राहत असल्याने प्रत्येक निवडणुकीत हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर येतो. ‘बोहिरागतो’ (बाहेरचा) हा मुद्दाही महत्त्वाचा ठरतो. हिंदू मतदारांमध्ये सीमापार ‘घुसखोरी’ची भीती व्यक्त केली जाते, तर मुस्लिम समुदायात या चर्चेमुळे स्वतःच्या वैधतेबद्दल चिंता निर्माण होते.

मुर्शिदाबाद आणि मालदा भागांत एनआरसीसारख्या प्रक्रियांमुळे मतदान हक्क गमावण्याची भीतीही तीव्र आहे. या सर्वांमुळे कल्याणकारी योजनांपेक्षा अस्मितेचे राजकारण अधिक प्रभावी ठरत असल्याचे दिसते. २०१६ नंतर भाजप आणि तृणमूल काँग्रेस या दोन्ही पक्षांनी या मुद्द्यांवर सक्रिय भूमिका घेतली. भाजपने मतुआ-बहुल भागांत नागरिकत्व सुधारणा कायदा हा प्रमुख मुद्दा बनवत स्वतःला कायदेशीर मान्यतेचा हमीदार म्हणून सादर केले. मुस्लिमबहुल भागांत मात्र भाजपने ‘घुसखोरी’, लोकसंख्या बदल आणि निवडणूक प्रामाणिकतेचा मुद्दा पुढे करत हिंदू मतदारांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला.

तृणमूल काँग्रेसने याला प्रत्युत्तर देताना एनआरसीसारख्या प्रक्रियांमुळे सर्वसामान्यांनाच फटका बसेल, असा युक्तिवाद केला. मतुआ समाजात त्यांनी कल्याणकारी योजनांवर आणि सांस्कृतिक ओळख मान्यतेवर भर दिला, तर मुस्लिम समाजात स्वतःला संरक्षणात्मक राजकीय पर्याय म्हणून उभे केले.

२०११ मध्ये तृणमूल काँग्रेसच्या उदयानंतर सीमावर्ती जिल्ह्यांतील डाव्यांचे दशकांतील वर्चस्व संपुष्टात आले. २०१६ मध्ये तृणमूलने आपली पकड अधिक मजबूत केली, तर डावे कमकुवत झाले. २०२१ पर्यंत, या भागातील राजकारण द्विध्रुवीय स्वरूपात परिवर्तित झाले. हिंदू-बहुल आणि मतुआ-बहुल मतदारसंघांत भाजपला यश मिळाले, तर मुस्लिमबहुल भागांत तृणमूल काँग्रेसने वर्चस्व कायम राखले.

सीमावर्ती मतदारसंघांतील राजकारण हे केवळ विकास किंवा कल्याणावर आधारित नसून, नागरिकत्व, अस्मिता आणि लोकसंख्याशास्त्रीय भीती या घटकांच्या गुंतागुंतीतून आकार घेत असल्याचे स्पष्ट दिसते.